RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784

वर्ष ३ रे | अंक : १४४ वा सोमवार दि. १ जुलै २०२५ पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

जिल्हा रुग्णालयात अधिकारी व भ्रष्ट कंपनीची मिलिभगत उघड?

काम न करता पैसे घेतलेल्या कंपनीला परत कंत्राट दिल्याचा धक्कादायक प्रकार...

जनसंचलन/बुलढाणा

येथील जिल्हा सामान्य रुग्णालय केवळ भ्रष्ट आणि नालायकपणाचा कळस गाठलेल्या अधिकाऱ्यांचा अड्डा बनल्याचे स्पष्टपणे आता दिसून येऊ लागले आहे. कारण एकीकडे सोलापूरच्या ज्या कंपनीला मॉड्यूलर ऑपरेशन थिएटर व लेबर रूमचे काम करण्याचे कंत्राट दिलेले होते, त्या कंपनीने काम पूर्ण न करताही त्याला ८० टक्के रक्कम अदा करण्याचा प्रताप येथील अधिकाऱ्यांनी केला होता. परंतु त्याहून कळस म्हणजे अशा भ्रष्ट कंपनीला पुन्हा एकदा कंत्राट देण्याचा आल्याचा धक्कादायक प्रकार जिल्हा सामान्य रुग्णालयात घडला आहे. यावरून जिल्हा रुग्णालयात कार्यरत काही अधिकारी किती नालायक असतील, याचा प्रत्यय येतो. यापूर्वीच्या जिल्हा शल्यचिकित्सकांनी पोट फुटेस्तोवर भ्रष्टाचार केलेला आहे परंतु नवनियुक्त जिल्हा शल्यचिकित्सक बिराजदार यांनी भ्रष्टाचाऱ्यांवर योग्य ती कारवाई करावी, अशी अपेक्षा आज अनेक जण व्यक्त करीत आहेत. याबाबत सविस्तर माहिती अशी की, येथील जिल्हा रुग्णालयाचे कामकाज आणखी चांगले होण्यासाठी व नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा मिळण्यासाठी अत्याधुनिक अशा मॉड्यूलर ओटीचे २३ कोटी रुपयांचे काम प्रशासनाने काढले होते. या कामासाठी निविदा काढून सोलापूरच्या कंपनीला नियमबाह्य हे कंत्राट देण्यात आले. कंपनीने सुरवातीला काही जुजबी पद्धतीने कामकाज केले नंतर हे कामकाज पूर्णपणे बंद करण्यात आले. गेल्या अनेक वर्षांपासून आजही ही मॉड्यूलर ओटी अक्षरशः भंगार अवस्थेमध्ये आहे. खरेतर अशाप्रकारे अर्धवट काम करणाऱ्या कंपनीवर लवकरात लवकर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्याची गरज असताना जिल्हा रुग्णालयातील तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नितीन तडस यांनी कंपनीला चक्क या कामाचे ८० टक्के बिल अदा करून टाकले. खरेतर तडस यांच्या अत्यंत निर्लज्ज अशा कारभाराचा हा नमुना आहे. काम पूर्ण झाल्याचे कोणतेही पुरावे नसताना कंपनीला ८० टक्के रक्कम अदा केली गेल्यामुळे या प्रकरणी नितीन तडस व कंपनीमध्ये नक्कीच मोठी देवाणघेवाण झाल्याची चर्चा जिल्हा रुग्णालयात आहे. आज ही मॉड्यूलर ओटी अक्षरशः भंगार अवस्थेत असल्यामुळे त्याद्वारे कुठल्याही प्रकारची आरोग्य सुविधा ही सर्वसामान्य नागरिकांना मिळत नाही. विशेष म्हणजे गेल्या काही वर्षांमध्ये या ठिकाणी बरेच प्रभारी किंवा पूर्णवेळ जिल्हा शल्यचिकित्सक आलेत. परंतु प्रत्येकाने आपल्या अत्यत निर्लज्जपणाचा व नालायक कारभाराच नमुना पेश केलेला आहे. कारण अर्धवट काम करणाऱ्या कंपनीवर आजवर आलेल्या एकाही जिल्हा शल्यचिकित्सकाने या प्रकरणी योग्य ती कायदेशीर कारवाई केलेली नाही. दुसरीकडे तडस यांच्यासह तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पंडित, डॉ. चव्हाण सह इतर यांच्या कार्यकाळात भांडारपाल प्रकाश बोथे यांच्याशी संगनमत करून औषधी व उपकरणांच्या खरेदीत कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. यामध्येही आजवर प्रकाश नामदेव बोथे हल्ली मुक्काम गोरक्षण रोड परिसर यांच्यावर बरखास्तीची अगदीच तोंडदेखली कारवाई करण्याव्यतिरिक्त काहीही झालेले नाही. जिल्हा रुग्णालयात बोकाळलेला हा भ्रष्टाचार

सोलापूर येथील एन.एल.हेल्थ केअर कंपनीला काळ्या यादीत टाकून काम पूर्ण न करता अदा केलेली करोडो रुपयांची देयके व्याजासह वसूल करावी व संबंधित अधिकाऱ्यांवर फोजदारी गुन्हे दाखल करण्याचा अहवाल देऊनही कारवाई शून्य जिल्हा सामान्य रुग्णालयासह नाशिक येथील कंत्राटदाराचा ही आहार घोटाळा प्रकरण समोर येत आहे

खरे तर राज्याच्या विधानसभेपर्यंत पोहोचलेला आहे. परंतु प्रत्येक जण आपल्या नालायक कारभारात अत्यंत व्यस्त असल्याचे दिसत आहे. या सर्वांवर कहर म्हणजे हाती जी माहिती आली आहे ती अत्यंत धक्कादायक आहे. सोलापूरच्या ज्या कंपनीला मॉड्यूलर ओटीचे काम देण्यात आले होते आणि त्या कंपनीने ते काम पूर्ण केले नाही, त्याच कंपनीच्या मालकाच्या दुसऱ्या कंपनीला जिल्हा रुग्णालयात कंत्राट देण्यात आलेले आहे. त्यामुळे आता जिल्हा रुग्णालयातील अधिकारी या भ्रष्टाचारात उघडपणे सामिल असल्याचे १०० टक्के सिद्ध झाले आहे. जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचारी अधिकारी व कर्मचारी आता इतके मस्तवाल झाले आहेत की, त्यांना भ्रष्टाचार करताना कशाचीही लाज-शरम वाटत नाही. ते भ्रष्टाचारावर भ्रष्टाचार करीत सुटले आहेत. अर्धवट काम करणाऱ्या कंपनीच्या ज्या मालकावर चक्क फौजदारी कारवाई करायला पाहिजे होती, त्या व्यक्तीवर जिल्हा रुग्णालयातील अधिकारी पुन्हा मेहेरबान झाले व त्यांनी त्याला दुसरे काम देऊन टाकले, त्यामुळे आता जिल्हा रुग्णालयातील अधिकारी भ्रष्ट आहेत हे सांगण्यासाठी कोणाही तज्ञाची गरज उरलेली नाही. परंतु जिल्हा रुग्णालयात भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई होण्याऐवजी त्यांना बक्षिसी मिळत असल्याची परंपरा गेल्या अनेक वर्षांपासून येथे सुरू आहे.



यापूर्वीच्या जिल्हा शल्यचिकित्सकांनी भ्रष्टाचाराच्या पिकाला खतपाणी आणि भ्रष्टाचाराच्या पिकांची कापणी केली असली, तरी नव्याने आलेले कर्तव्यदक्ष जिल्हा शल्यचिकित्सक बिराजदार साहेब यापेक्षा काहीतरी वेगळे करतील, अशी अपेक्षा या निमित्ताने बुलढाणेकर नागरिक बाळगून आहेत. किमान नागरिकांची ही अपेक्षा फोल ठरू नये आणि भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई केली जावी, असे आवाहन आम्ही या माध्यमातून नवनियुक्त जिल्हा शल्यचिकित्सकांना करी आहोत. जिल्हा रुग्णालयातील अधिकारी जरी असला भयानक नालायकपणा आणि भ्रष्टाचार करीत असले, तरी दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज या भ्रष्टाचाराविरोधात सातत्याने आपली मोहीम सुरूच ठेवणार आहे. अर्धवट काम करणाऱ्या कंपनीचा मालक आणि जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचाऱ्यांवर जोपर्यंत कारवाई होत नाही, तोपर्यंत आम्ही या भ्रष्टाचारावर चाबूक चालवण्याचे काम करीतच राहणार आहोत.

अजून बरेच काही पुढील भागात

विजयराज शिंदे यांची डाळीला फोडणी त्या ठिकाणचाही अन्नाचा दर्जा तपासा!

तिथे ठेके कुणाचे, ठेकेदार कुणाचे चेलेचपाटे?

जनसंचलन/ बुलढाणा

आमदार निवासात डाळीचा वास अन् बुलढाण्यात रुग्णांना निकृष्ट दर्जाचा घास! या मथळ्याखाली हॅलो बुलढाणा ने तत्पूर्वी वृत्त प्रकाशित केले होते.या वृत्तावर आता माजी आमदार तथा भाजपाचे जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांनी आज आपली प्रतिक्रिया व्यक्त केली. बुलढाण्यात विविध शासकीय ठिकाणी मिळणाऱ्या अन्नाचा दर्जा तपासण्यात यावा व तेथे ठेके कुणाचे

आहेत? ठेकेदार कुणाचे चेलेचपाटे आहेत? याच्या चौकशीची मागणी शिंदे यांनी केली आहे. आम.संजय गायकवाड यांनी आमदार निवासातील कॅन्टीनमध्ये ऑपरेटरला डाळीचा वास येत असल्याने मारहाण केल्याचा मुद्दा राज्यभर गाजत आहे. दरम्यान हॅलो बुलढाणाने बुलढाण्यातील जिल्हा सामान्य रुग्णालयासह इतर आर.एच.मध्ये देखील दर्जेदार जेवण मिळत नसल्याचा मुद्दा उपस्थित केला होता.या संदर्भातील वृत्तावर विजयराज शिंदे यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली.शिंदे म्हणाले की, जिल्हा सामान्य रुग्णालय, वैद्यकीय महाविद्यालय किंवा महिला रुग्णालयसह इतर या ठिकाणी अन्नाचा दर्जा तपासणे अत्यंत गरजेचे आहे.तेथे ठेके कुणाचे आहेत, ते ठेकेदार कुणाचे चेले चपाटे आहेत? पुरविण्यात येत असलेल्या आहाराचे आता पर्यंत खोटी कागदपत्रे देऊन करोडो रुपयांचे बिले काढल्याचा स्फोट करण्यात आला असून याची चौकशी झाली पाहिजे अशी मागणी विजयराज शिंदे यांनी मिडीया समोर केली. तसेच यासंदर्भात पुढील काळात पत्रपरिषद घेणार असल्याचे सांगितले आहे.

शस्त्रसज्जतेचे पुढचे पाऊल...

संपादकीय लेख

संरक्षण दलांसाठी एक लाख कोटी रुपयांच्या शस्त्रखरेदीस देशाच्या संरक्षण खरेदी परिषदेने मान्यता दिल्याने भविष्यातील आव्हानांचा सामना करण्यासाठी शस्त्रसज्ज होण्याच्या सेनादलांच्या मार्गावरील एक पाऊल पुढे पडले आहे. पाकिस्तानशी नुकत्याच झालेल्या संघर्षानंतर शस्त्रसज्जतेची गरज प्रकर्षाने समोर आली आहे; त्या पार्श्वभूमीवर संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत काही कळीच्या खरेदीप्रस्तावांना मान्यता मिळाली. त्यामध्ये रखडलेल्या काही प्रस्तावांचाही समावेश आहे. एकीकडे चीन आणि दुसरीकडे पाकिस्तान अशा आघाड्यांवर सज्ज राहण्याचे आव्हान समोर असताना नव्या तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करण्याखेरीज पर्याय नाही. त्यामुळेच या शस्त्रखरेदीच्या निर्णयास महत्त्व आहे. परिषदेने दिलेल्या मान्यतेमध्ये, नौदलासाठी बारा सुरुंगविरोधी नौकांचा समावेश आहे. पाण्याखालील सुरुंगांचा शोध घेऊन ते नष्ट करण्याची क्षमता असलेल्या अशा नौकांची मागणी नौदलाकडून पूर्वीपासून करण्यात येत आहे. गेल्या १५ वर्षांत यासाठी तीन वेळा प्रयत्न झाले, दक्षिण कोरियाशीही त्याच्या पुरवठ्याबाबत वाटाघाटी झाल्या; मात्र विविध कारणांनी ही खरेदी मार्गी लागू शकली नव्हती. त्यासोबतच युद्धभूमीवर नादुरुस्त झालेली वाहने किंवा रणगाड्यांच्या दुरुस्तीसाठी वापरण्यात येणारी ङ्गरिकव्हरी व्हेइकलफ, शत्रूची रडार किंवा अन्य प्रणाली निकामी करणारी इलेक्ट्रॉनिक युद्धप्रणाली आणि जमिनीवरून मारा करणाऱ्या क्षेपणास्त्रांच्या खरेदीलाही या निर्णयाने गती मिळणार आहे. जगात शांतता नांदली पाहिजे आणि संरक्षणावरील खर्च कमीतकमी झाला पाहिजे, हे मूल्य आदर्श असले, तरी सध्याची भू-राजकीय स्थिती पाहता त्याचे पालन व्यावहारिक दृष्ट्या अशक्यप्राय आहे. अमेरिकेसह सर्व महासत्ता जागतिक व्यासपीठांवर शांततेची व्याख्याने देत असल्या, तरी प्रत्यक्षात ते आपली शस्त्रास्त्रसज्जता वाढवतानाच दिसून येतात. त्यामुळेच, संभाव्य युद्ध वा पहलगामसारख्या दहशतवादी हल्ल्यांचे सावट कायम असताना स्वसंरक्षणार्थ शस्त्रास्त्रसज्जता वाढविण्यावाचून भारतापुढे पर्याय नाही. सध्या सुरू असलेले रशिया-युक्रेन आणि इस्रायल-हमास युद्ध आणि नुकत्याच थांबलेल्या इस्रायल-इराण तणावाच्या काळात नव्या तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर झाला. पाकिस्तानशी झालेल्या संघर्षामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचे बळ हा सर्वांत महत्त्वाचा घटक ठरला. भारताची खोडी काढण्याची पाकिस्तानला वारंवार उबळ येत असली, तरी चीन हाच भारताचा खरा शत्रू आहे, असे अनेक तज्ज्ञांचे मत आहे. ते विचारात घेतले, तर चीनच्या संरक्षण सज्जतेवर बारीक नजर ठेवणे क्रमप्राप्त आहे. सध्या चीनचे संरक्षण अंदाजपत्रक सुमारे सव्वादोनशे अब्ज डॉलर असून, भारताच्या तरतुदी त्या तुलनेत कमीच आहेत. चीनची सागरी शक्ती सातत्याने वाढत असल्याने सागरी धोक्यांचा विचार करता भारतीय नौदल शस्त्रसज्ज करण्यास प्राधान्य देणे, ही काळाची गरज आहे. अण्वस्त्रसज्जतेने प्रतिकार शक्ती हाती आल्याने पारंपरिक शस्त्रांवर अवलंबून राहण्याचे प्रमाण कमी होईल, ही समजूत होती. त्यामध्ये काही प्रमाणात तथ्य असले, तरी सध्या जगभरात सुरू असलेल्या युद्धांकडे पाहिले, तर पारंपरिक शस्त्रास्त्रांचा वापर अपरिहार्य असल्याचे दिसते. गेल्या काही काळात युद्धांमध्ये मनुष्यहानीचे प्रमाण कमीत कमी ठेवण्याकडे साऱ्या जगाचा कल आहे. त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित युद्धप्रणालीस कमालीचे महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या शस्त्रांची निर्मिती कळीची बनली आहे. आत्मनिर्भर भारतफ्सारख्या योजनांद्वारे आयातीवरील अवलंबित्व कमी करण्याचा आणि भविष्यात निर्यातीला गती देण्याचा प्रयत्न होत आहे. त्यासाठी उत्तर प्रदेश, तमिळनाडू आणि महाराष्ट्रातील काही भागांत ङ्गडिफेन्स हबफ्ना चालना देण्यात येत असून खासगी क्षेत्रालाही यामध्ये मोठा वाव आहे. मात्र, सध्याची भू-राजकीय परिस्थिती पाहता लढाऊ विमाने, क्षेपणास्त्रे आणि नव्या युद्धप्रणाली संरक्षण दलांना तातडीने उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्यामुळेच सध्या तरी संरक्षण क्षेत्रातील आयातीस पर्याय नाही. काही दिवसांपूर्वीच हवाईदल प्रमुखांनी शस्त्रांच्या उपलब्धतेबाबत नाराजी व्यक्त केली होती. त्या पार्श्वभूमीवर भारतीय संरक्षण निर्मिती व संशोधन क्षेत्रातील कूर्मगती दूर करण्याचे मोठे आव्हान समोर आहे. भारतात संशोधनावरील खर्चाकडे ङ्गअनुत्पादक खर्चफ म्हणून पाहण्याची मानसिकता बदलण्यासह प्रत्यक्ष निर्मिती प्रक्रिया गतिमान करणे आणि खरेदी व्यवहारांत अतिसावधपणाने येणारी स्थितीवादी निष्क्रियताही दूर करण्याची नितांत गरज आहे. त्यातूनच शस्त्रसज्जतेसह अर्थव्यवस्थेला गती देण्याचेही उद्दिष्ट साध्य होऊ शकेल.

वीज निर्माते बना, वीजबिल शुन्यापर्यंत कमी करा!

प्रधानमंत्री सुर्यघर मोफत वीज योजनेचा पिंपळगाव सरईत जागर!

जनसंचलन/बुलढाणा

प्रधानमंत्री सुर्यघर मोफत योजनेमुळे प्रत्येकाला आपल्या घराच्या छतावर वीज निर्मिती करून वीज निर्माता बनन्यासोबत स्वताचे वीज बिल शुन्यापर्यंत कमी करण्याची संधी आहे. एवढेच नाही तर प्रत्येक ग्राहकाला ७८ हजार रूपयापर्यंत अनुदान आणि गावासाठी १ कोटी रूपयाचे केंद्रीय सहाय्य मिळणार आहे.त्यामुळे एकंदरीत स्वत्रासोबत गाव विकासासाठी अत्यंत महत्वाच्या असलेल्या या योजनेचा गावकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन महावितरणचे अधिक्षक अभियंता सुरेंद्र कटके यांनी केले. प्रधानमंत्री सुर्यघर मोफत योजनेअंतर्गत जिल्ह्याधिकारी डॉ.किरण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ङ्गङ्घमॉडेल सोलर व्हिलेज स्पर्धेत १५ गावाचा सहभाग आहे. सहा महिन्यानंतर या १५ गावातील जास्त सौर क्षमता निर्माण करणाऱ्या गावाची जिल्ह्यातील

मॉडेल सोलर व्हिलेज म्हणून निवड होणार असून त्या गावाला १ कोटी रूपयाचे अर्थसहाय्य मिळणार आहे. जिल्ह्यातील पिंपळगाव सरई हे गाव मॉडेल सोलर व्हिलेज स्पर्धेतील १५ गावापैकी एक गाव असून या गावात महावितरणकडून मेळावा घेण्यात आला.अधीक्षक अभियंता सुरेंद्र कटके यांच्या प्रमुख उपस्थितीत गावकऱ्यांना एकत्रित करण्यात आले. त्यांना योजना आणि योजनेचे फायदे समजावून सांगण्यात आले.तसेच अर्ज प्रक्रीया आणि महावितरणकडून पुढाकार घेत ग्राहकाला सहकार्य करण्याच्या हमी देण्यात आली. यावेळी कार्यकारी अभियंता मंगलसिंग चव्हाण, उपकार्यकारी अभियंता राजेश कायंदे, सहाय्यक अभियंता राहुल निंबाळकर, प्रशांत पडघान, विभागीय कार्यालय लिपिक ललित सोळंके, सचिन इंगळे, रायपुर वितरण केद्रातील स्तफ्फ अमोल जाधव, प्रवीण गवते, गणेश शेळके, दत्तात्रय काशपाग तसेच पिंपळगाव सारी गावामधील केशव तरमाळे, संजय खंदारे (उपसरपंच) , रामेश्वर गवते, गुलाबराव कोरके, ग्रामपंचायत अधिकारी अविनाश मानकर हजर होते.

नेहमीच तेच चेहरे, तेच घराणे! सामान्यांना पक्ष देणार का संधी?

ही निवडणूक जनतेची होणार की घराणे शाहीची?

जनसंचलन/बुलढाणा

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका काही महिन्यांवर येऊन ठेपल्या आहेत आणि सगळ्या पक्षांनी मोर्चाबांधणीला सुरुवातही केली आहे. मात्र यात पुन्हा एकदा नेहमीचाच प्रश्न समोर आला आहे राजकारण म्हणजे काही मोजक्या घराण्यांचीच मक्तेदारी आहे का? नगराध्यक्ष, नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य अशा पदांवर निवडून येणाऱ्यांत बहुतांश वेळा तेच राजकीय वारसदार किंवा जुन्या नेत्यांचे नातेवाईक दिसतात. सामान्य जनतेचा प्रतिनिधी कुठे आहे? पत्रकार, शिक्षक, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते हे सगळे काय फक्त सतरंज्या उचलायला व मत देण्यासाठीच? कोणताही पक्ष असो उमेदवारीसाठी सर्वसामान्य माणसाची दारं कायम बंदच दिसतात. काही ठिकाणी तर मागे पडलेले, कामगिरीहीन नेते पुन्हा पुन्हा पुढे रेटले जातात. समाजकारणाच्या नावाखाली केवळ पैसाकारण सुरू असल्याचे स्पष्टपणे दिसते. जनतेमध्ये आता संतापाची लाट आहे. विकासासाठी नव्या चेहऱ्यांची गरज आहे, जुन्या साच्यातून बाहेर पडण्याची वेळ आली आहे. पक्षांनी जर यावेळी देखील पारंपरिक चेहऱ्यांनाच संधी दिली, तर मतदारही यावेळी गप्प बसणार नाहीत, ही काळ्या दगडावरची रेघ ठरेल!

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

खंडाळा घाटात भीषण अपघात; ट्रकमधील पाइप वाहनांवर पडून दोघींचा मृत्यू, पाच गंभीर जखमी

लोणावळा: जुन्या मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावर बोरघाटातील (खंडाळा) चढावर पाइप वाहून नेणाऱ्या ट्रकचा अचानक ब्रेक लागल्याने ट्रकमधील पाइप धक्क्याने मागे घसरून ट्रकच्या मागे असलेल्या दुचाकी आणि कारवर पडले अन् भीषण अपघात झाला. या अपघातात दोन महिलांचा जागीच मृत्यू झाला; तर पाच जण गंभीर जखमी झाले. हा अपघात शनिवारी सायंकाळी सातच्या सुमारास खंडाळा घाटातील मॅजिक पॉइंट येथे घडला. अपघातामुळे या मार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. ऋतुजा चव्हाण (२६, रा. वारजे), अंकिता शिंदे (२८, रा. नेरे,

मुळशी) असे अपघातात मृत्यू झालेल्या महिलांची नावे आहेत. वैभव गलांडे (२९), सोनाली खडेत्रे (३३), शिवराज खडेत्रे (६), लता शिंदे (५०, सर्व रा. वारजे), ललित शिंदे (३०, नेरे, मुळशी) अशी जखमींची नावे आहेत.खोपोली पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जुन्या मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावरून खोपोलीहून खंडाळा (बोर) घाटातून पुण्याकडे चाललेल्या ट्रकच्या चालकाने घाट चढत असताना अचानक ब्रेक मारला. त्यामुळे ट्रकमधील लोखंडी पाइप ट्रकमधून निसटले आणि ते मागून येत असलेल्या कार आणि दुचाकीवर पडले. या अपघातात दुचाकीवरील ऋतुजा चव्हाण यांचा मृत्यू झाला; तर मागे बसलेले वैभव गलांडे जखमी झाले. कारमध्ये बसलेल्या अंकिता शिंदे यांनाही जीव गमवावा लागला; तर कारमधील सोनाली, शिवराज, लता आणि ललित हे जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच दस्तुरी (बोरघाट) महामार्ग सहायक पोलिस निरीक्षक स्वप्नील पाटील, खोपोली पोलिस निरीक्षक सचिन हिरे, सहायक पोलिस निरीक्षक ठाकरे व हवालदार अमोल धायगुडे यांनी सहकाऱ्यांसह; तसेच देवदूत आपत्कालीन पथक, आयआरबी पेट्रोलिंग, ङ्गडेल्टा फोर्सफचे कर्मचारी यांनी घटनास्थळी धाव घेऊन घटनेची पाहणी करून अपघातात पाइपखाली अडकलेल्या महिलांना मोठ्या प्रयत्नांनी बाहेर काढले. मात्र, तोपर्यंत त्यांचा मृत्यू झाला होता. जखमींना उपचारासाठी तत्काळ खोपोली येथील हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. पोलिसांनी दोन्ही अपघातग्रस्त वाहने बाजूला करून विस्कळित झालेली वाहतूक पूर्ववत करण्यात आली. या घटनेचा पुढील तपास खोपोली पोलिस ठाण्याचे पोलिस हवालदार अमोल धायगुडे करीत आहेत.

काळी बाहुली अन् टोचलेले लिंबू, रात्रीच्या वेळी स्मशानभूमीत पैशांचा पाऊस पाडण्याची तयारी झाली, तेवढ्यात

रायगड : माणूस जस जसा प्रगत होत गेला तस तसं त्याने स्वतःच्या फायद्यासाठी अनेक गोष्टींची निर्मिती केली. विज्ञानाच्या जोरावर तंत्रज्ञानात प्रगती करुन स्वतःच्या सुखसोईंकरिता बऱ्याच गोष्टींचा मानव निर्माता झाला. सगळ्या गोष्टी झटपट मिळाव्यात यासाठी अनेक पर्याय खुले केले. कमीत कमी मेहनत आणि जास्तीत जास्त आरामदायी जीवन जगण्याकडे माणसाचा कल वाढतोच आहे. झटपट श्रीमंत होणं ही जवळपास सगळ्यांचीच इच्छा असते. पण त्यासाठी मेहनत करण्याची तयारी फार थोडेच लोक दाखवतात. समाजात एखाद्याच्या अडचणीचा फायदा घेणारे, पैशांचा पाऊस पाडण्याचा दावा करणारे भामटे पदोपदी दिसतात. तसं पहायला गेलं तर पैसा कोणाला नकोय? पण मेहनत न करता पैसा कसा मिळेल याचा शॉर्टकट शोधणारेच जास्त दिसतात. हाच शॉर्टकट मग भारी पडतो. कारण त्यातूनच गुन्हा जन्माला येतो अन् मग होत्याचं नव्हतं होतं.रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील हालीवली गावातील स्मशानभूमीत

जादूटोणा करताना काही इसम आढळून आले आहेत. हा प्रकार शुक्रवार, दिनांक ११ जुलै रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास उघडकीस आला. या घटनेमुळे परिसरात काही काळ खळबळ उडाली.मिळालेल्या माहितीनुसार, हालीवली गावाच्या आदिवासी वाडीच्या स्मशानभूमीत काही अनोळखी व्यक्ती संशयास्पद हालचाली करत असल्याचे स्थानिकांच्या लक्षात आले. त्यांनी तात्काळ त्या ठिकाणी धाव घेतली आणि दोघांना पकडून चांगलाच चोप दिला. दरम्यान, त्यांच्या सोबत असलेले चौघे इसम घटनास्थळावरून पळून गेले. आदिवासी तरुणांच्या सतर्कतेमुळे हा प्रकार उघडकीस आला आहे. सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार पकडण्यात आलेल्या दोघांमध्ये शिंदे नामक स्थानिक असून दुसरा व्यक्ती पाली, सुधागड येथील असल्याचे समजते. पोलिसांनी याबाबत खबर घेतली असून अधिक तपास सुरू आहे.या प्रकारामुळे समाजात आजही अंधश्रद्धा किती खोलवर रुजलेली आहे हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. अशा रूढींविरुद्ध समाजात जागरूकता निर्माण करणे आणि कायद्याची कडक अंमलबजावणी करणे गरजेचे आहे, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थांनी केली आहे. कर्जत पोलिस ठाण्याकडून या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे

पोलिस कर्मचाऱ्याच्या पत्नीसोबत अधिकाऱ्याकडून वाईट कृत्य, नागपुरात मुंबईच्या विरुद्ध गुन्हा दाखल

नागपूर: पोलिस अधिकाऱ्याने मित्र असलेल्या पोलिस कर्मचाऱ्याच्या पत्नीवर बलात्कार केला. ही खळबळजनक घटना कोंढाळी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील वाघविला रिसॉर्ट येथे घडली. याप्रकरणी पोलिसांनी पोलिस उपनिरीक्षकाविरुद्ध बलात्कार, ॲट्रॉसिटीसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला. दीपक नीलकंठराव अंकुरकर (रा. विरार पोलिस शासकीय वसाहत, मुंबई) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे नाव आहे. नागपुरात राहणाऱ्या ३३वर्षीय महिलेच्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला. प्राप्त माहितीनुसार, महिलेचा पती २०१०मध्ये गडचिरोली पोलिस दलात दाखल झाला. दीपकही येथे शिपाई होता. महिलेचा पती व दीपक हे बालमित्र असल्याने दोघांची ओळख आहे. दरम्यान, २०१७मध्ये दीपक विभागीय परीक्षेंतर्गत उपनिरीक्षक झाला. सध्या तो विक्रोळी पोलिस ठाण्यात कार्यरत आहे.जानेवारीत दीपक, त्याचे कुटुंब, महिला व तिचे कुटुंब तसेच अन्य मित्रांनी गोव्याला जाण्याची

योजना आखली. यासाठी दीपकने व्हॉट्सॲप ग्रुपही तयार केला. ५ ते १२ जानेवारीदरम्यान सर्वजण गोव्याला गेले. यावेळी दीपकने महिलेशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर तो तिला सतत मेसेज करायला लागला.फेब्रुवारीत मित्राच्या मुलाच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमासाठी दीपक कुटुंबासह नागपुरात आला. कार्यक्रमानंतर दीपक व त्याच्या अन्य तीन मित्रांचे कुटुंब वाघविला येथे गेले. १५ फेब्रुवारीला महिला खोलीत एकटी होती. दीपक खोलीत गेला व तिच्यावर बलात्कार केला. त्यानंतर दीपक महिलेला शरीरसुखाची मागणी करायला लागला, असे महिलेचे म्हणणे आहे. तिने पतीला याबाबत सांगितले. पतीच्या मदतीने तिने कोंढाळी पोलिसांत तक्रार दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल केला. दीपकच्या अटकेसाठी कोंढाळी पोलिसांचे पथक मुंबईत तळ ठोकून आहे.

ब्यूटी पार्लरमध्ये नोकरी देतो, तरुणीला पुण्यात आणलं अन् बुधवार पेठेत नेण्याचा प्रयत्न, दोघांना अटक

पुणे : ब्यूटी पार्लरमध्ये नोकरी देतो, असे सांगून बांगलादेशातून पुण्यात आणलेल्या एका तरुणीला बुधवार पेठेत वेश्या व्यवसाय करण्यासाठी धमकावल्याचा प्रकार उघड झाला. या तरुणीने वेश्या व्यवसायास नकार दिल्यामुळे खोलीत डांबून तिला पट्ट्याने मारहाण करण्यात आली.ही घटना एका सामाजिक संस्थेच्या निदर्शनास आल्यानंतर सहकारनगर पोलिसांच्या मदतीने तरुणीची सुटका केली. या प्रकरणी तिघा जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका सामाजिक संस्थेने तक्रार दिली आहे.अभिषेक संथेबेन्नूर, तमन्ना शेख, रकीब खान अशी आरोपींची नावे असून, त्यांच्याविरुद्ध अनैतिक

मानवी वाहतूक प्रतिबंधक कायदा (पीटा), लैंगिक अत्याचारांपासून बालकांचे संरक्षण कायदा (पोक्सो), पारपत्र अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी अभिषेक आणि तमन्ना यांना अटक केल्याची माहिती पोलिसांनी दिलीपोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी ही आरोपी तमन्ना शेखच्या ओळखीची होती. अभिषेक तमन्नाच्या परिचयाचा असून, तो एका हॉटेलमध्ये काम करतो. तमन्नाने तरुणीला ब्यूटी पार्लरमध्ये नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवले. त्यानुसार ती बेंगळुरूला आरोपी रकीबकडे आली. तिथून तिला पुण्यात आणले. त्यानंतर तिला जबरदस्तीने वेश्या व्यवसायात ढकलण्याचा प्रयत्न करण्यात आला. तिने विरोध केल्यावर अभिषेकने तिला पट्ट्याने मारहाण केली आणि खोलीत बंद करून ठेवले.या तरुणीने मोबाइलवरून बांगलादेशातील पोलिसांशी संपर्क साधला. त्यांनी पुण्यातील एका सामाजिक संस्थेशी संपर्क केला. संस्थेने सहकारनगर पोलिसांना माहिती दिली. सहकारनगर ठाण्यातील गुन्हे शाखेच्या निरीक्षक सुरेखा चव्हाण यांच्या पथकाने शोध मोहीम राबवून दोन आरोपींना अटक करून पीडितेची सुटका केली.या बांगलादेशी तरुणीला भारतात आणल्यानंतर केवळ १५ दिवसांत या आरोपींनी तिचे आधार कार्ड काढल्याचेही प्राथमिक तपासातून समोर आले आहे. या प्रकरणात अटक आरोपींना न्यायालयाने पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावली.अलिकडेच विमानतळ पोलिस ठाण्याअंतर्गत गुन्हे शाखेने कारवाईत केली असता, १५ वर्षांच्या मुलींना वेश्या व्यवसायात ढकलल्याचे चित्र पाहायला मिळाले होते. मानवी तस्करीच्या स्वरूपात अल्पवयीन मुलींना राज्याच्या बाहेरुन आणले जात असून त्यांना जबरदस्तीने देहविक्रीच्या धंद्यात आणले जात आहे.

सात वर्षांचा संसार कोलमडला, फुलराणी सायना नेहवालचा घटस्फोट, पारुपल्ली कश्यपपासून विभक्त

मुंबई : स्टार बॅडमिंटन खेळाडू सायना नेहवाल आणि पारुपल्ली कश्यप यांनी रविवारी घटस्फोट घेतल्याचा निर्णय जाहीर केला. सायनाने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करत याबद्दल माहिती दिली. सात वर्षांपूर्वी विवाहबंधनात अडकलेले सायना आणि पारुपल्ली यांनी वैयक्तिक कारणांमुळे वेगळे होण्याचा निर्णय घेतला आहे. दोघांनी हैदराबादमध्ये पुलेला गोपीचंद बॅडमिंटन अकादमीमध्ये प्रशिक्षण घेत एकत्रच करिअरचा श्रीगणेशा केला होता.सायना नेहवाल आणि पारुपल्ली कश्यप यांचे २०१८ मध्ये लग्न झाले होते. क्रीडा विश्वातील स्टार जोडी म्हणून सायना आणि पारुपल्ली यांच्याकडे पाहिले जात होते. दोघांच्या निर्णयामुळे त्यांच्या चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे.सायना नेहवालने २०१२ मध्ये लंडन ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकले आणि २०१५ मध्ये जागतिक बॅडमिंटन क्रमवारीत पहिले स्थान पटकावले. ती जगातील नंबर वन शटलर बनणारी पहिली भारतीय महिला खेळाडू ठरली. दुसरीकडे, पारुपल्ली कश्यपने २०१४ मध्ये ग्लासगो कॉमनवेल्थ गेम्समध्ये

सुवर्णपदक जिंकले आणि जागतिक क्रमवारीत सहाव्या स्थानावर पोहोचला.सायनाने तिच्या इंस्टाग्राम स्टोरीमध्ये लिहिले आहे, ङ्गङ्गकधी कधी आयुष्य आपल्याला वेगवेगळ्या दिशांना घेऊन जाते. खूप विचार केल्यानंतर पारुपल्ली आणि मी वेगळे होण्याचा निर्णय घेतला आहे. आम्ही स्वतःसाठी आणि एकमेकांसाठी शांतता, प्रगती आणि दिलासादायक आयुष्याची निवड करत आहोत. मी सर्व चांगल्या आठवणींसाठी आभारी आहे आणि पुढे जाताना फक्त शुभकामना व्यक्त करते. या काळात आमच्या गोपनीयतेचा आदर केल्याबद्दल धन्यवाद.ङ्गङ्ग कश्यपने अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही.प्रकाश पादुकोण आणि पुलेला गोपीचंद यांच्यानंतर बॅडमिंटनच्या खेळात भारताला जागतिक स्तरावर ओळख मिळाली नव्हती. सायना नेहवालने २००८ च्या बीजिंग ऑलिम्पिकमध्ये महिला एकेरीत उपांत्यपूर्व फेरी गाठून भारतामध्ये या खेळाला नवसंजीवनी दिली.चार वर्षांनंतर २०१२ च्या लंडन ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकून ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकणारी ती पहिली भारतीय बॅडमिंटन खेळाडू ठरली. त्यानंतर भारतात बॅडमिंटन खेळाडूंची नवीन पिढी उदयास आली, जी जागतिक स्तरावर देशाचे नाव उज्ज्वल करत आहे.

हे सर्व अतिशय अस्वस्थ करणारं, सुप्रिया सुळे नेमकं काय म्हणाल्या?

मुंबई : संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर अक्कलकोटमध्ये शाईफेक करण्यात आल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. कारण प्रवीण गायकवाड यांच्यावर केवळ शाईफेक करण्यात आली नाही तर त्यांना धक्काबुक्कीदेखील करण्यात आली आहे. या घटनेचे व्हिडीओ देखील समोर आले आहेत. या घटनेवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. सुप्रिया सुळे यांनी आपल्या अधिकृत एक्स अकाउंटवर भूमिका मांडली आहे.महाराष्ट्रातील सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणारे संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रविणदादा गायकवाड यांच्यावर अक्कलकोट येथे भ्याड हल्ला करण्यात आला. त्यांच्या तोंडावर शाई फेकण्यात आली. हे सर्व अतिशय अस्वस्थ करणारे असून या घटनेचा निषेध करावा तितका कमीच आहे. हे निषेधार्ह कृत्य करणाऱ्यांवर कठोरात कठोर कारवाई झालीच पाहिजे ही आमची भूमिका आहे, असं सुप्रिया सुळे म्हणाल्या. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी देखील या घटनेवर प्रतिक्रिया दिली. ङ्गङ्गशिव, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांनी बहुजन समाजासाठी कार्य करणारे संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष प्रविण गायकवाड यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याचा जाहीर निषेध करतो. या हल्लेखोरांवर तात्काळ कारवाई झाली नाही तर कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. भाजपचा हल्लेखोर आणि त्यामागील सूत्रधार याला शोधून गृहमंत्र्यांनी कडक कारवाई करावी, अशी मागणी विजय वडेट्टीवार यांनी केली

पावसाळी अधिवेशनासाठी काँग्रेसची मोर्चेबांधणी; रणनीती निश्चित करण्यासाठी उद्या बैठक..

नवी दिल्ली: संसदेच्या आगामी पावसाळी अधिवेशनासाठी पक्षाची रणनीती ठरविण्यासाठी काँग्रेस संसदीय पक्षाच्या नेत्या सोनिया गांधी यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी महत्त्वाची बैठक होणार आहे. या अधिवेशनात विरोधक आणि सरकारमध्ये विविध मुद्द्यांवर संघर्ष होण्याची शक्यता आहे. बिहारमधील मतदारयाद्या, पहलगाम हल्ला आणि ऑपरेशन सिंदूर आदी मुद्द्यांवर चर्चा करण्याच्या दृष्टीने या बैठकीत चर्चा होणे अपेक्षित आहे. काँग्रेसच्या संसदीय रणनीती गटाच्या बैठकीला काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी

उपस्थित राहण्याची शक्यता आहे. सोनिया गांधी यांच्या १०, जनपथ या निवासस्थानी ही बैठक होणार असल्याची माहिती पक्षातील सूत्रांनी दिली. संसदेचे पावसाळी अधिवेशन २१ जुलैपासून सुरू होणार असून २१ ऑगस्टपर्यंत चालणार असल्याचे सरकारने जाहीर केले आहे. यापूर्वी हे अधिवेशन १२ ऑगस्टला संपणार होते, मात्र आता ते एका आठवड्याने वाढविण्यात आले आहे.अणुऊर्जा क्षेत्रात खाजगी क्षेत्राचा प्रवेश सुलभ करण्यासाठी महत्त्वपूर्ण कायदे आणण्याची सरकारची योजना असताना अधिवेशनाचा कालावधी वाढवला आहे. अणुक्षेत्र खासगी कंपन्यांसाठी खुले करण्याच्या केंद्रीय अर्थसंकल्पातील घोषणेची अंमलबजावणी करण्यासाठी सरकार अण्वस्त्र नुकसानीसाठी नागरी दायित्व कायदा आणि अणुऊर्जा कायद्यात सुधारणा करण्याच्या विचारात आहे. त्यावरही चर्चा होणे अपेक्षित आहे.

पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारतीय सैन्याने पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर केलेल्या ऑपरेशन सिंदूर या विषयावर चर्चा व्हावी, अशी विरोधकांची मागणी आहे. तसेच अणुयुद्ध टाळण्यासाठी भारत-पाकिस्तान संघर्षात मध्यस्थी करण्याच्या अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेल्या दाव्यावरही विरोधी पक्ष सरकारकडे जाब विचारण्याच्या तयारीत आहेत. पावसाळी अधिवेशनात बिहारमधील मतदारयाद्यांचे विशेष सखोल पुनरावलोकन करण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयावर विरोधी पक्षांकडून तीव्र चिंता व्यक्त करण्याची शक्यता आहे. तसेच पहलगाम हल्ला, ऑपरेशन सिंदूर तसेच त्यानंतर च्या राजनैतिक चर्चे वर चर्चा व्हावी, अशी मागणी काँग्रेसने केलेली आहे.

कन्नडच्या माजी सरपंचाला भरदिवसा निर्घृणपणे संपवलं; तिघांना अटक, धक्कादायक कारण समोर...

छत्रपती संभाजीनगर: भरदिवसा गावाच्या माजी सरपंचवर कोयत्याने वार करून त्याची निघृण हत्या केल्याची घटना कन्नड ग्रामीण भागातील मौजे शिरसगाव येथे घडली. मृत माजी सरपंचाचे नाव राजाराम उर्फ राजू भावसिंग चुंगडे (वय ४७) असे आहे. या प्रकरणात पोलिसांनी तीन जणांना ताब्यात घेतले आहे. तिघांनी हा खून गावातील वादातून केल्याची कबुली दिली.मारेकऱ्यापैकी एकाने पोलिसांच्या तपासाची दिशा भरकटविण्यासाठी महिलेची वेशभूषा घालून चुंगडे यांचा खून केल्याची माहिती पोलिस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांनी दिली. खून करणाऱ्यांचे नावे आनंद अमर राजपूत (वय २५), समीर समद कुरेशी (वय २०) आणि इरफान शकील शहा (वय २०, तिघेही रा. सिरसगाव, ता. कन्नड) असे आहे.कन्नड तालुक्यातील सिरसगाव येथे माजी सरपंच यांच्या खुनाबाबत माहिती देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत पोलिस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांच्यासह अपर पोलिस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह, विजयकुमार ठाकूरवाड,

विजयसिंह राजपूत यांची उपस्थिती होती. डॉ. विनयकुमार राठोड यांनी सांगितले, ङ्गमाजी सरपंच राजाराम उर्फ राजू भावसिंग चुंगडे १२ जुलै रोजी शेतातील त्यांच्या घरासमोरील खडीवर मोबाइल बघत बसले होते. एका दुचाकीवर तीन जण आले. त्यांनी चुंगडे यांच्यावर वार करून खून करून मारेकरी पळून गेले.फ्ढॉ. राठोड यांनी दिलेल्या माहितीनुसार चुंगडे यांचा खून करण्यामागे वेगवेगळी कारणे आहेत. आनंद राजपूत याला चुंगडेने एक ते दीड वर्षापूर्वी मारहाण केली होती. त्याचा बदला घेण्यासाठी राजपूतने कट रचला. समीर कुरेशीवर कन्नड ग्रामीणमध्ये ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल होता. त्यात चुंगडेने मदत केली नव्हती. इरफान शहा आणि चुंगडे याच्यात कब्रस्तानाच्या जागेवरून वाद होता. या वादातून तिघांनी चुंगडे याची हत्या केली. गुन्हे शाखेने संशयित आनंद अमर राजपूतला शिरसगावातून ताब्यात घेतले. त्याने दिलेल्या माहितीवरून, खुनातील साथीदार समीर कुरेशी आणि इरफान शहा या दोघांना श्रीरामपूर येथून ताब्यात घेण्यात आले आहे. गुन्हे शाखेच्या पथकाने घटना दाखल होण्याच्या २४ तासांच्या तिन्ही आरोपींना ताब्यात घेतले आहे.ही कारवाई गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विजयसिंह राजपुत, संतोष मिसळे, पवन इंगळे, सुधीर मोटे, श्रीमंत भालेराव, वाल्मिक निकम, विठ्ठल डोके, शिवानंद बनगे, गोपाल पाटील, प्रशांत नांदवे, अशोक वाघ, महेश बिरूटे, योगेश तरमाळे, जीवन घोलप, रामचंद्र पवार, पोलिस उपनिरीक्षक जाधव, व त्यांच्या सहकाऱ्यांनी ही कारवाई केली.

मी महाराष्ट्राची मुलगी पण... मराठी-हिंदी भाषा वादाविषयी शिल्पा शेट्टीने दिले स्पष्ट उत्तर

मुंबई: महाराष्ट्रातील शाळांमध्ये त्रिभाषा सूत्रानुसार हिंदी सक्ती करण्याच्या मुद्द्यावरुन गेल्या काही महिन्यांपासून मोठा वाद पेटला आहे. अलीकडे मीरा-भाईंदरमध्ये मनसे कार्यकर्त्यांनी व्यापाऱ्याला मारहाण केल्याचे समोर आल्यानंतर, हा वाद आणखी चर्चे त आहे. यासंदर्भातच बोलताना अभिनेत्री शिल्पा शेट्टी कुंद्राने मला मराठी माहीत आहे, मी महाराष्ट्राची मुलगी आहे असे स्पष्टपणे जाहीर केले. संजय दत्त आणि शिल्पा यांची महत्त्वाची भूमिका असणाऱ्या या आगामी केडी - द डेव्हिल चित्रपटाच्या टीझर लाँच कार्यक्रमात ती बोलत होती. अभिनेत्रीने या विषयावर थोडक्यात पण महत्त्वाचे वक्तव्य केले. महाराष्ट्रात मराठी आणि हिंदी भाषिकांमध्ये तणावाची परिस्थिती आहे. यातून खटके उडाले आहेत आणि मारहाणीच्या घटनादेखील घडल्या. या पार्श्वभूमीवर अभिनेत्रीने केलेले वक्तव्य लक्षवेधी ठरले. शिल्पाने या कार्यक्रमात मराठी भाषेबद्दलचा अभिमान व्यक्त केला. राज्यात भाषेच्या मुद्द्यावरुन सुरू असणाऱ्या वादाबद्दल अभिनेत्रीने मत काय आहे असे तिला विचारण्यात आले. मला मराठी माहित आहे, मी महाराष्ट्राची मुलगी आहे, असे म्हणत तिने उपस्थितांची मने जिंकली.मात्र तिने सविस्तर याविषयी भाष्य न करता पुढे असे म्हटले की, पण सध्या केडी सिनेमाबद्दल बोलत आहोत, तर त्यामुळे केडीबद्दल न विचारता, तुम्ही इतर कोणत्याही वादाकडे जाणार असाल, तर आम्ही त्याला प्रोत्साहन देणार नाही. आमचा सिनेमा अनेक भाषांमध्ये येणार आहे, तर आम्ही मराठीमध्येही डब करू शकतो.याशिवाय शिल्पासह याआधी गायक उदित नारायण यांनी भाषेच्या विविधतेबद्दल असे मत मांडले की, आपण महाराष्ट्रात राहतो आणि ही माझी कर्मभूमी आहे. त्यामुळे इथली भाषाही महत्त्वाची आहे. त्यासोबतच आपल्या देशातील इतर सर्व भाषा तितक्याच महत्त्वाच्या आहेत.दरम्यान शिल्पाच्या सिनेमाबद्दल सांगायचे झाल्यास हा एक कन्नड भाषेतील सिनेमा आहे. ती दीर्घकाळानंतर मोठ्या पडद्यावर दिसणार आहे. संजय दत्त, ध्रुव सरजा, नोरा फतेही, रेश्मा नानाय्या, व्ही. रविचंद्रन, रमेश अरविंद आणि जिस्सू सेनगुप्ता यांच्याही भूमिका आहेत. गुरुवारी सिनेमाच्या टीझर लॉन्च सोहळ्यात चित्रपटातील जवळपास सगळे कलाकार उपस्थित होते.

नांदेडमध्ये राष्ट्रवादीत चाललंय तरी काय? कार्यकारिणी निवडीवरून पक्षातील बडा नेता नाराज; चिखलीकरांना उघडपणे सुनावले

नांदेड : राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून आज जिल्ह्याची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. नांदेड शहर आणि नांदेड ग्रामीण जिल्हाध्यक्षांसह खांदेपालट करण्यात आले. रविवारी आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी कार्यकारिणीची घोषणा करून नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी नांदेड दक्षिणच्या निवडीवरून माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांनी आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्यासमोरच उघडपणे नाराजी व्यक्त केली. तुमच्या नेतृत्वात काम करायला तयार आहोत, पण आम्हाला सासूबाई म्हणून विचारत जा. तुरीचं मुगाच किंवा पिठलं खाऊ घाला, असं म्हणत खतगावकर यांनी चिखलीकरांना टोमणा मारला. दरम्यान निवडीवरून राष्ट्रवादी अजित पवार गटातील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला आहे.नांदेडमध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटात प्रवेशाचा धडाका सुरु आहे. अनेकजण जण राष्ट्रवादी पक्षात प्रवेश करत आहेत. पक्षात प्रवेश करणाऱ्यांना आज नवीन जवाबदाऱ्या देण्यात आल्या. पदाधिकाऱ्यांचे खांदेपालट करून नवीन कार्यकारिणी आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी जाहीर केली. यात शहर जिल्हाध्यक्षपदी माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, प्रदेश उपाध्यक्षपदी मीनल खतगावकर, शहर जिल्हा कार्याध्यक्षपदी माधव पावडे तर, नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्षपदी शिवराज पाटील होटाळकर यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली. या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देखील देण्यात आले. पत्रकार परिषदेदरम्यान माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांनी ग्रामीण जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर यांच्या नियुक्तीवरून आमदार चिखलीकरावर उघडपणे नाराजी व्यक्त केली. आपल्याला विश्वासात न घेता ही निवड जाहीर करण्यात आल्याचे खतगावकर म्हणाले.आमदार प्रताप पाटील चिखलीकर हे आज सकाळपासून माझ्यासोबत होते आणि एकत्र नाष्टा केला. तरी, नांदेड दक्षिणच्या नियुक्तीबाबत आमचे ठरले नव्हते, असे असतानाही चिखलीकरांनी आम्हाला न सांगता नांदेड दक्षिणची नियुक्ती जाहीर केली आहे. पक्ष वाढवण्यासाठी तुम्ही निश्चित प्रयत्न करा पण, सासूबाई म्हणून आम्हाला एकदा तरी विचारा. याबाबत आपण वरिष्ठांशी बोलणार असल्याचे खतगावकर यांनी सांगितले.नाराजी व्यक्त करत खतगावकर म्हणाले, आम्हाला तुमच्या नेतृत्वात काम करायचं आहे. काय करायचं आहे ते करा, पण सासूबाई म्हणून आम्हाला पण विचारत जा. तुरीचं, मुगाचं किंवा पिठलं खाऊ घाला, पण आम्हाला थोडं स्वातंत्र्य लागेल, अस म्हणत आपली पाठ दुखत असल्याचे कारण देत, खतगावकर हे अर्ध्यातच पत्रकार परिषद सोडून निघून गेले. दरम्यान भास्करराव पाटील खतगावकर यांनी थेट पक्षातील आमदारावर नाराजी व्यक्त केल्याने राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय बनला आहे. दरम्यान माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांच्या नाराजीनंतर आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी स्पष्टीकरण दिले. सगळ्यांना विश्वासात घेऊनच पक्षाने हा निर्णय घेतला आहे. एखाद्याची नाराजी असू शकते, जिल्ह्याच नेतृत्व करत असताना सगळ्यांना सांभाळून घ्यायला पाहिजे अस माझं मत असल्याचे आमदार चिखलीकर म्हणाले. खतगावकर हे जेष्ठ नेते आहेत, सगळ्याच गोष्टी सर्वांच्या मनासारखे होतं नाहीत. प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या स्वाक्षरीने नियुक्त असल्याचे चिखलीकर म्हणाले.

ज्या सरकारी डॉक्टरच्या विश्वासावर नोकरीसाठी घर सोडून आली, त्यानेच केला अत्याचार; तरुणीचा गंभीर आरोप

पाटणा : बिहारमधून संतापजनक घटना समोर आली आहे. मध्य प्रदेशातून बिहारमधील वैशाली जिल्ह्यात आलेल्या एका युवतीवर बलात्काराचा प्रयत्न करण्यात आला. लालगंज पोलीस स्टेशन परिसरात ही घटना घडली. नोकरी देण्याच्या नावाखाली एका सरकारी डॉक्टरने तिला बोलावले आणि तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी आरोपी डॉक्टरला अटक केली आहे, तर पुढील तपास सुरू केला आहे. लालगंज पोलीस स्टेशन हद्दीतील जैतीपूर प्राथमिक आरोग्य केंद्रात म्हणून कार्यरत असलेला सुनील कुमार हा आरोपी आहे. त्याने मध्य प्रदेशातील एका तरुणीला नोकरी देण्याचे आमिष दाखवून वैशाली येथे बोलावले. डॉक्टरवर विश्वास ठेवून ती तरुणी मध्य प्रदेशातून तेथे आली. डॉक्टरने लालगंजमधील आपल्या खोलीवरच तिला थांबवून घेतले. शनिवारी रात्री डॉक्टरने तिच्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न केला.डॉक्टरने तरुणीचे कपडे फाडले आणि तिला मारहाण केली. ज्यामध्ये तिचा दात तुटला आहे, असा आरोप आहे. या प्रकारानंतर कसातरी तिने तेथून पळ काढला आणि आरडाओरड केली. तिचा आवाज ऐकून औषध दुकानदार आणि इतर लोक त्याठिकाणी धाव घेतली. त्यांनी तिला चादर दिली आणि कपडे दिले. घटनेची माहिती मिळताच ११२ डायल पथक आणि लालगंज पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी आरोपी डॉक्टरला अटक केली आहे.पोलिसांनी डॉक्टरची ब्रेथ एनालायझरने तपासणी केली, ज्यामध्ये त्याने दारु प्यायल्याची पुष्टी झाली. लालगंज पोलीस स्टेशनच्या स्टेशन हाऊस ऑफिसरने सांगितले की, आरोपी डॉक्टर राजस्थानचा आहे आणि तो आरोग्य विभागात नोकरी करतो. पीडित तरुणी सोशल मीडियाद्वारे डॉक्टरच्या संपर्कात आली होती. तरुणी गुन्हा दाखल करण्यास तयार नव्हती, परंतु पोलिसांनी तिचे तुटलेले मोबाईल दुरुस्त करण्याचे काम सुरू केले आहे. जेणेकरून अधिक माहिती मिळू शकेल. पोलिसांनी तपास अधिक जलद केला असून आरोपीला तुरुंगात पाठवण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

मनसे-शिवसेना ठाकरे गटाची युती होणार? आदित्य ठाकरेंची सूचक प्रतिक्रिया; म्हणाले, हे सेंटिमेंट महाराष्ट्र हिताचं

मुंबई : मुंबईमध्ये पाच जुलैला ठाकरे बंधुंचा एकत्रित मराठी भाषा विजयी मेळावा पार पडला. या मेळाव्याला ठाकरे गट आणि मनसे दोन्ही पक्षाच्या प्रमुखांसह सर्व नेते एकत्रित आल्याचे पाहायला मिळत आहे. या मेळाव्याच्या निमित्ताने तब्बल वीस वर्षांनंतर महाराष्ट्रात ऐतिहासिक चित्र पाहायला मिळालं. ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्यानं अवघा महाराष्ट्र सुखावला. पुन्हा एकदा मनसे आणि शिवसेना ठाकरे गट युतीच्या चर्चांना बळ मिळाले. पण राज ठाकरेंनी नेत्यांना युतीविषयी भूमिका न मांडण्याच्या सूचना दिल्याने संभ्रम निर्माण होत आहे. आता युतीबाबत शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.माध्यमांशी संवाद साधताना आदित्य ठाकरे म्हणाले, सध्या महाराष्ट्रात वातावरण आहे, दोन्ही भावांनी एकत्र यावे यासाठी वातावरण आहे. यावर सविस्तर चर्चा होईल, पण हे सेंटिमेंट महाराष्ट्र हिताचं आहे. महाराष्ट्राच्या मनात आहे ते होईल.आदित्य ठाकरेंनी जनसुरक्षा विधेयकावरून सरकारवर टीकाही केली आहे. फडणवीसांच्या विधानावर प्रत्युत्तर देताना आदित्य ठाकरेंनी ते म्हणतात की डावी विचारसरणी? पण ज्या देशात ८० टक्के लोक रेशन वर राहतात, ते सरकार कोणत्या विचारसरणीचं आहे डावं की उजवं? असा खडा सवाल उपस्थित केला आहे.आदित्य ठाकरेंनी जनसुरक्षा विधेयकाबाबत प्रश्न उपस्थित केले. ज्या योजना आपण काढतो त्या लेफ्टिंग आहेत, सध्या संविधानाला धोका निर्माण झाला आहे. भाजपचेच खासदार आहेत ते संविधान विरोधी आहेत. त्यांच्यावरही कारवाई करणार आहात का? आतापर्यंत ज्या कारवाया झाल्या त्या कोणत्या कायद्यांतर्गत केल्या? जे अतिरेकी, नक्षलवादी असतील त्यांना सोडायचं नाही, पण या कायद्यात जनसुरक्षा हित नाही, ते जे आणण्याचा प्रयत्न करत आहेत, त्याला आम्ही विरोध करत आहोत. यामुळे मीडियाचे सुद्धा स्वातंत्र्य निघून गेले आहे, असे आदित्य म्हणाले.

भाजपाच्या शहर अल्पसंख्यांक मोर्चाचे अध्यक्षपदी मोहम्मद अखिल यासीन खान यांची नियुक्ती

जनसंचलन/बुलढाणा

भारतीय जनता पार्टीच्या अल्पसंख्यांक शहर मंडलाच्या अध्यक्षपदी मोहम्मद अखिल यासीन खान उर्फ हाजी खान यांची नियुक्ती भाजपाचे शहर अध्यक्ष मंदार बाहेकर यांनी आज दिनांक १३ जुलै २०२५ रोजी केली आहे. भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांच्या आदेशान्वये शहराध्यक्ष मंदार बाहेकर यांनी ही नियुक्ती केली आहे. भारतीय जनता पार्टीच्या अल्पसंख्यांक आघाडीचे संघटन मजबूत करण्याकरिता ही जबाबदारी मोहम्मद अकिल यासीन खान यांच्यावर देण्यात आली आहे. त्यांचे सामाजिक राजकीय काम पाहून त्यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीनंतर अल्पसंख्याक समाज आणि शहरांमध्ये भारतीय जनता पार्टीचे मोठे संघटन उभे राहणार आहे अशी प्रतिक्रिया त्यांनी यावेळी दिली.

कुत्ता गँगची दहशत!

मोकाट कुत्र्यांना आवरणार कोण? एका महिन्यात ६९९ जणांना चावा!

जनसंचलन/बुलडाणा

शहरासह जिल्ह्यातील विविध रस्त्यांवर बिनधास्तपणे वावरणारे मोकाट कुत्रे वाहनांवर झेपावतात. जाणाऱ्या-येणाऱ्या नागरीकांसह शाळेत जाणाऱ्या लहान मुलांच्या पाठीमागे लागतात.दररोज कुठे ना कुठे कुत्र्याने चावा घेतल्याच्या घटना घडताहेत. जिल्ह्यात एका महिन्यात ६९९ जणांना कुत्र्यांनी चावा घेतल्याचा आकडा आहे. परिणामी या भटक्या कुत्र्यांना आवरणार कोण? असा प्रश्न उपस्थित होत असून नगरपालिके विरोधात रोष व्यक्त होतोय. नगरपालिकेकडून दरवर्षी कुत्र्यांच्या निर्बीजीकरणा साठी लाखो रुपयांची तरतूद केली जाते. परंतु निर्बीजीकरण करण्यात नगर पालिका उदासीन आहे.उघड्यावरच मटनांची दुकाने असल्याने मोकाट कुत्र्यांची संख्या वाढत आहे. ९ जुलै रोजी एका पिसाळलेल्या कुत्र्याने येथील हिरोळे पेट्रोल समोर एका व्यक्तीवर हल्ला चढवला. याच कुत्र्याने १४ जणांना चावा घेतल्याची माहिती पुढे आली. मोकाट कुत्र्यांमुळे जखमी होणाऱ्या नागरिकांची संख्या देखील दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे नगरपालिकेने तातडीने मोकाट कुत्र्यांचे निर्बीजीकरण करण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज निर्माण झाली आहे. जिल्ह्यासह शहरातील बहुतांश भागात मोकाट कुत्र्यांचे जत्थेच जत्थे फिरत असतात. हे कुत्रे अचानक हल्ले करीत असल्याने महिलांसह, अबालवृध्द, लहान मुले जखमी होण्याचे प्रमाण वाढले आहे. मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी वारंवार करण्यात येत आहे. परंतु यावर कुठलीच उपाययोजना करण्यात आली नाही.



क्रांतिकारी च्या निवेदनाची उपवनसंरक्षक यांनी त्वरित घेतली दखल

वन्य प्राण्यांच्या बंदोबस्तासाठी मिर्झा नगर परिसरात बसविले पिंजरे

वृत्तसंस्था/बुलढाणा

जिल्हा मुख्यालय असलेल्या बुलडाणा येथील मिर्झा नगरात हिस्त्र जंगली प्राण्यांचा वावर वाढला आहे. त्यामुळे नागरिक भयभीत झाली असून तातडीने बंदोबस्त करावा अशा मागणीचे निवेदन क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने उपवनसंरक्षक यांना देण्यात आले. या निवेदनाचे त्वरित दखल घेत उपवनसंरक्षक यांनी वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करण्यासाठी पिंजरे लावण्याचे आदेश दिले आणि संबंधित कर्मचाऱ्यांनी तातडीने मिर्झा नगर परिसरात पिंजरे बसविले, यामुळे नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे.

गुन्हा शहरातील मिर्झा नगर हा भाग डोंगराच्या कडेला आहे. त्यामुळे या भागात नेहमीच जंगली प्राण्यांचा वावर दिसून येतो. गेल्या दोन महिन्यापासून बिबट्या,अस्वल,रान डुकरांचा वावर अधिक प्रमाणात आढळून येत आहे. संध्याकाळ झाली की बिबटे, अस्वल व इतर प्राणी मानव वस्तीमध्ये शिरून कुत्रे,डुकरे यांची शिकार करताना वारंवार दिसत आहेत. त्यामुळे या परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. संध्याकाळ झाली की घराच्या बाहेर निघणे मुश्किल झाले आहे. या भागात लहान मुलांची शाळा आहे , मदरसा आहे. परंतु मुलांना अगदी सकाळी व सायंकाळी घरावर पाठवणे धोक्याचे झाले असल्याने पालक चिंतेत आहेत. स्थानिक नागरिकांनी या संदर्भात यापूर्वी देखील वनविभागाला या प्रकाराबाबत माहिती देऊन उपाययोजना करण्याची मागणी केली होत, परंतु वन विभागाकडून कोणतीच कार्यवाही झाली नाही. त्यामुळे मिर्झा नगर येथील नागरिकांनी युवा नेते रविकांत तुपकर यांची भेट घेऊन कैफियत मांडली. यावेळी रविकांत तुपकर यांनी सर्वांची समस्या जाणून घेतल्यानंतर क्रांतिकारीचे अमोल मोरे व टीम यांना सदर नागरिकांना घेऊन उपवनसंरक्षक यांची भेट घेण्याचे सांगितले. त्यानुसार अमोल मोरे व टीमने तसेच मिर्झा नगर येथील नागरिकांनी

उपवनसंरक्षक अधिकारी यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. त्यांनी या निवेदनाची तात्काळ दखल घेत वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करण्यासाठी मिर्झा नगर परिसरात पिंजरा लावण्याचे आदेश दिले. त्यानुसार वन कर्मचाऱ्यां कडून संध्याकाळ पर्यंत पिंजरे लावण्यात आले. यामुळे या भागातील नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला असून भीतीचे वातावरण देखील निवळले आहे. निवेदन देताना क्रांतिकारी चे अमोल मोरे, शत्रुघ्न तुपकर, मिर्झा नगर येथील नागरिक राजा खान,साद खान,ओसामाभाई,अरमान भाई,कामरान भाई,अली भाई, रिहान भाई, इशाज भाई, शानबाज इ.कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

धाड ग्रामपंचायतीत अनागोंदी!

रिजवान सौदागर न्यायालयात दाद मागणार!

जनसंचलन/बुलडाणा

बुलढाणा (हॅलो बुलढाणा) तालुक्यातील धाड ग्रामपंचायतमध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरप्रकार झाल्याचा आरोप करून ग्रामपंचायतमधील अनागोंदी विरोधात न्यायालयात दाद मागणार असल्याची माहिती धाड ग्रामपंचायतचे माजी सरपंच रिजवान सौदागर यांनी पत्रकार परिषदेत दिली. स्थानिक पत्रकार भवन येथे रविवार १३ जुलै रोजी आयोजित पत्रकार परिषदेत माहिती देतांना ते पुढे म्हणाले की, दोन जणांना काही महिती नसतांना त्यांच्या नावावर ग्रापंचायतचा चेक देवून पैसे काढले. याबाबत जिल्हा परिषद मुख्याधिकाऱ्यांकडे तक्रार केल्यानंतर त्यांनी याकडे लक्ष न दिल्यामुळे विभागीय आयुक्त यांच्याकडे तक्रार केली. त्यानंतर अहवाल मागितल्यावर जिल्हा परिषद मुख्याधिकाऱ्यांनी त्यामध्ये नमूद केले की, त्या लोकांच्या खात्यात पैसे जमा झाले.

त्यांनी ते पैसे काढले परंतू यामध्ये भ्रष्टाचार झाला नाही. अतिक्रमण प्रकरणात उच न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने अतिक्रमण काढण्याचे आदेश दिल्यानंतर सुध्दा दिलेल्या मुदतीत ते अतिक्रमण काढण्यात आलेले नाही, त्यामध्ये काही कारवाई दाखवावी यासाठी काही अतिक्रमण काढले व काही राहू दिले, ग्रामपंचायत सदस्याच्या नातलगाला ग्रामपंचायतचे टेंडर देता येत नाही. तरी टीका खान यांना टेंडर देण्यात आले. बांधलेली नाली रातोरात अज्ञात व्यक्तीने तोडून टाकली. त्याप्रकरणी धाड पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली परंतू पोलिसांनी चौकशी केली नाही. तसेच पुन्हा ती नाली बांधण्यात आली, पाप्रकरणी जिल्हा परिषद सीईओ यांच्याकडे तक्रार दाखल केल्यावर त्यांनी कुठलीही कार्यवाही केलेली नाही. या सर्व यंत्रणांवर दबाव आहे. सर्व अधिकारी हे खाजगीत सांगतात की, मुंबई वरून दबाव आहे. त्यांचे नाव माहित आहे. परंतू माझ्या जीवाचे बरे वाईट होवू शकते व्यामुळे त्यांचे नाव घेणार नाही. असेही ते म्हणाले. यावेळी धाड ग्रामपंचायत सदस्याची उपस्थिती होती.

शेतकऱ्यांची फसवणूक करून केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव संस्थापक अध्यक्षांचा वाढदिवस साजरा?

महाराष्ट्र अर्बन को ऑप क्रेडिट सोसायटी मधील प्रकार!

अमोल पळसकर यांची जिल्हा उपनिबंधकांना तक्रार दाखल!

जनसंचलन/मेहकर

येथील महाराष्ट्र अर्बन को अप क्रेडिट सोसायटीत शेतकऱ्यांची फसवणूक करून सोसायटी अध्यक्षाचा वाढदिवस जल्लोषात साजरा करण्यात आल्याचा आरोप आहे. शेतकऱ्यांच्या पैशातून सोसायटी अध्यक्ष्यांच्या वाढदिवसानिमित्त बॅनर लावण्यात आले. कॅलेंडर, जाहिराती खर्च सुद्धा शेतकऱ्यांच्या पैशातून करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे अनेक प्रकारात शेतकऱ्यांची फसवणूक करण्यात आली आहे. त्यामुळे डोणगाव येथील महाराष्ट्र अर्बन को ऑप सोसायटीसह संपूर्ण महाराष्ट्रातील इतर शाखांची उच्चस्तरीय समिती मार्फत चौकशी करून तात्काळ कारवाई करावी, अन्यथा अन्नत्याग आंदोलन करण्यात येईल. असा इशारा डोणगाव येथील अमोल सुभाष पळसकर यांनी बुलढाणा जिल्हा उपनिबंधक यांना निवेदनाद्वारे दिला आहे. निवेदनात नमूद केले आहे. की, डोणगाव येथील महाराष्ट्र अर्बन को अप क्रेडिट सोसायटीत ३० लाख रुपये कर्ज मंजूर होवुन सदर कर्जाच्या सुरक्षीततेसाठी ३० लाख रुपयांच्या शेतीचे गहाणखत लिहुन घेवून आजपर्यंत कर्ज दिले नसून मंजूर होवून सदर कर्जाचा ७/१२ उताऱ्यावर बोजा चढवून पूर्ण कर्जाची रक्कम न देता केवळ २० लाख रुपये देवून फसवणूक केली आहे. उर्वरित रक्कम १० ते १२ दिवसांमध्ये देवु असे सांगीतले. त्यानुसार जमिनीच्या व्यवहाराकरिता ५ लाख रुपये इसारा पोटी दिले होते. परंतु गैरअर्जदाराने मला आजपर्यंत उर्वरित रक्कम १० लाख रुपये न दिल्याने माझे १९ ते २० लाख रुपयांचे नुकसान झाले. तसेच सोसायटीने आकारलेले व्याजदराबाबत सुध्दा माहिती मागीतली. परंतु, त्यांनी दिली नाही. तर दिलेल्या कर्जाचा तात्काळ भरणा करा अन्यथा मालमत्ता जप्त करू, अशी धमकी दिली. गैरअर्जदाराने वाढदिवसाच्या जाहिरातीचे पैस व कॅलेंडर चे पैसे सुद्धा अनधिकृतपणे माझ्यावर लादले आहेत. गैरअर्जदाराच्या ह्या महाराष्ट्र अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसायटीच्या नावाखाली शेतकऱ्यांची लूट करत आहे व स्वतः च्या वाढदिवसाचे व कॅलेंडर द्वारे जाहिरात करण्याचे पैसे सुद्धा गैरअर्जदार शेतकऱ्यांकडून अनधिकृत कृत्य करून वसूल करत आहे. गैरअर्जदारामुळे माझे नुकसान झाले तसेच त्यांनी माझी फसवणुक केली. गैरअर्जदारामुळे माझ्यावर आत्महत्या करण्याची वेळ आली आहे. त्यामुळे गैरअर्जदाराचे पत संस्थेची मान्यता रद्द करून माझी नुकसान भरपाई द्यावी, तसेच डोणगाव येथील महाराष्ट्र अर्बन को अप क्रेडिट सोसायटीचे शाखाधिकारी यांच्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील शाखेंची उच्चस्तरीय समिती नेमून सखोल चौकशी करावी. तसेच परवाना रद्द करावा.गैरअर्जदारामुळे माझे दुहेरी नुकसान झाले व माझी फसवणूक झाली असून न्याय द्यावा, अशी मागणी अमोल सुभाष पळसकर यांनी जिल्हा उपनिबंधक यांना निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनाच्या प्रतिलिपी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सहकार मंत्री, सहकार आयुक्त पुणे, सहकार विभागीय आयुक्त अमरावती, शेतकरी नेते रविकांत तुपकर, आमदार सिद्धार्थ खरात, ठाणेदार यांना दिल्या आहेत.

संपूर्ण महाराष्ट्रात कोट्यावधी रुपयांचे घबाड बाहेर येण्याची शक्यता?

महाराष्ट्र अर्बन को अप क्रेडिट सोसायटीत शेतकऱ्यांची फसवणूक करून सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष तथा केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांचा वाढदिवस हा शेतकऱ्यांच्या पैशातून साजरा करण्यात आला आहे. केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या वाढदिवसाचा खर्च तसेच इतर खर्चाची रक्कम शेतकऱ्यांच्या नावावर अनधिकृत लादण्यात आली आहे. शेतकऱ्याच्या नावावर महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव सोसायटीत कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार करण्यात आला आहे. हा प्रकार महाराष्ट्रातील संपूर्ण शाखेमध्ये झाला असून महाराष्ट्र अर्बन को ऑपरेटिव्ह सोसायटीची महाराष्ट्रातील संपूर्ण शाखेचे चौकशी करू करावी. महाराष्ट्रातील सर्व शाखांमध्ये झालेल्या गैरप्रकाराची चौकशी केल्यास कोट्यावधी रुपयांचे घबाड बाहेर येण्याची शक्यता आहे. त्यामुळे योग्य ते चौकशी करून कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता गोरगरीब सर्वसामान्य शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी पळसकर यांनी तक्रार अर्जाद्वारे केली आहे.

वाणी किडीचे नियंत्रण कृषी विज्ञान केंद्राचा सल्ला...

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यातील सोयाबीन आणि इतर खरीप पिकांवर पैसा वाणी अ-कीटक वर्गीय किडीचा प्रादुर्भाव आढळून आल्याचे कृषी विज्ञान केंद्र, बुलडाणा यांनी स्पष्ट केले आहे. या किडीच्या नियंत्रणासाठी शेतकऱ्यांनी सतर्क राहून योग्य उपाययोजना करण्याचे आवाहन कृषी विज्ञान केंद्राचे विषय विशेषज्ञ प्रवीण देशपांडे व वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. ए. एस. झापे यांनी केले आहे. पैसा वाणी ही एक निशाचर कीड असून सामान्यतः सडणारी पाने, तसेच काडीकचरा, कुजणाऱ्या वनस्पती इत्यादी पदार्थांना खाऊन उपजीविका करत असते जेव्हा यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते तेव्हा ते जमिनीवर संपर्कात येणाऱ्या रोपावस्थेतील पिकांना खाऊन नुकसान करतात जमिनीलगत रोपे कोरतडून टाकतात. कालांतराने रोपांवर जाऊन पानेसुद्धा कुरतडतात यामुळे रोपांची संख्या कमी होऊन दुबार पेरणीची सुद्धावेळ येऊ शकते. या किडीच्या वाढीसाठी जमिनीत आद्रता असणे आवश्यक आहे. त्यामुळे पावसाळ्यात किंवा जिथे ओलीताची सोय अशा ठिकाणी ही किड जास्त सक्रिय असते. त्यामुळे खालील प्रमाणे उपायोजना कराव्यात. नियंत्रणासाठी उपायोजना: कृषी विज्ञान केंद्राने दिलेल्या सूचनांनुसार शेतकऱ्यांनी शेतातील पालापाचोळा व कुजलेला कचरा गोळा करून नष्ट करावा. रात्री गवताचे ढिग ठेवून सकाळी त्याखाली जमा झालेली वाणी साबण किंवा मिठाच्या द्रावणात टाकून नष्ट करावीत. बांधावरील गवत, दगड हटवून बांध मोकळा ठेवावा व शेतातील आर्द्रता कमी ठेवावी. वेळोवेळी कोळपणी करून जमिनीत लपलेल्या किडी व अंडी उघड्यावर आणावीत. पिक उगवल्यानंतर पैसा वाणीचा प्रादुर्भाव दिसल्यास क्लोरोपारीफॉस २० टक्के घटकयुक्त कीटकनाशक ३७.५ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पंपाचे नोझल ढिले करून रोपांभोवती वर्तुळाकार किंवा सरळ ओळीत आळवणी करावी १ एकर क्षेत्रात ४० पंपाचे ड्रिंचेंग करावे.

भरोसा गावच्या जुगाऱ्यांचा एक्का बादशाहवर भरोसा!

तीन जुगारी पकडले, ६८३४५ रुपयांचा मुद्देमाल जप्त!

जनसंचलन/ देऊळगाव राजा

ग्रामीण भागात एक्का बादशाह जुगार मोठ्या प्रमाणात सुरू असून,पोलिसांची जुगारावर कधी-मधी कारवाई दिसून येते.अंढेरा पोलीस स्टेशन हद्दीतील भरोसा गावात अनेक जुगाऱ्यांचा एका बादशाह या हारजीतच्या पत्यांच्या खेळावर भरोसा दिसून येतो.त्यामुळे येथे राजरोसपणे पत्ते कुटले जातात. मात्र एसपी निलेश तांबे यांची करडी नजर असल्याने, जुगार खेळणाऱ्या ३ जुगाऱ्यांना एलसीबीच्या पथकाने पकडले तर ३ जुगारी फरार झाले आहे. त्यांच्या कडून दूचाकीसह ६८३४५ रुपयांचा मुद्देमाल जप्तीची कारवाई करण्यात आली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी पदभार सांभाळल्यापासून अवैध धंद्यावर काहीसा चाप लावला आहे. त्यांच्या मार्गदर्शनात आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुनील अंबुलकर यांच्या नेतृत्वात धडक कारवाई सुरू आहे.दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त माहिती मिळाल्याने त्यांनी अंढेरा पोलीस ठाणे हद्दीतील भरोसा गावातील एक्का बादशाह जुगारावर धाड टाकली. या कारवाईमध्ये ३ जुगारी पकडल्या गेले तर ३ जुगारी फरार झाले आहे.जुगार साहित्य व बावन तास पत्ते आणि एक मोटर सायकल असा एकूण ६८३४५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.ही कारवाई स्थानिक गुन्हे

शाखेच्या पथकातील हेड कॉन्स्टेबल गजानन दराडे, जगदेव टेकाळे, दिगंबर कपाटे यांनी केली आहे. जिल्ह्यात शहरासह अनेक ग्रामीण भागात वरली मटका आणि जुगार सुरू असून,अशाच धडक कारवाईची अपेक्षा व्यक्त केली जात आहे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८